शाळा मान्यता आदेश

१९१

नमुना २

5151

क्र. भंजिप शिविप्रा/आर.टी. ई मान्य ./ 5151 / २५
कार्यालय शिक्षण विभाग प्राथमिक जि .प. भंडारा
दिनांक: २९/ ०९ / २०२५

व्यवस्थापक- क्रांती शिक्षण संस्था विरली /बु

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**मा .महोदय/महोदया,**

आपल्या दिनांक १८/०९/२०२५ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यहार/ शाळेचो केलेली तपासणी या आधारे

मी रवींद्र सोनटक्के, शिक्षणाधिकारी प्राथमिक दिनांक १/०५/२०२५ पासुन दिनांक ३०/०४/२०२८पर्यंत तीन वर्षाचा कालावधीसाठी इयत्ता १ते ८ करीता मदर टेरेसा पब्लीक स्कूल कोंढा पंस.पवनी जिल्हा भंडारा या शाळेत तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधिन आहे.**

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल .

२) बालकांना मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (जोडपत्र १) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र २) मधील तरतुदीचे, शाळा पालन करोल.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित घटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत,त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किंवा २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्ताच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद तीन मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.

५) संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही .आणि कोणत्याही छाननी पदधतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या --- पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात किंवा वंश ,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये यांची सुनिश्चीता शाळा करील.

Scanned with OKEN Scanner

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासण्यांच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

* शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ – ६०७० चौ.मि.
* एकुण बांधकाम क्षेत्र - २०४४चौ. चौ.मि.
* खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ ४०२६चौ. .मि.
* वर्गखोल्यांची संख्या - १३
* कार्यालय नि- भांडार नि- मुख्याध्यापकाची खोली- ५
* मुलांसाठी मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल -आहे
* पिण्याच्या पाण्याची सुविधा -आहे

दुपारी जेवन शिजवण्यासाठी स्वयंपाक घर: नाही

* अध्यापन, अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय याची उपलब्धता - आहे.

वाचन साहित्य विनासायास उपलब्ध- आहे

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा संस्था सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या, किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावे आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक २७१००७०५९०६असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी .

१७) शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

***आर टी ई २००९ नुसार गटशिक्षणाधिकारी यांचे शिफारसीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येते .**

(आर.एस. सोनटक्के)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद भंडारा

Scanned with OKEN Scanner